मार्च २००३

# मा. श्री. रत्नाकर गायकवाड आय.एस.अधिकारी महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त यांच्याकडून अपेक्षा नव्हती.

अखेर नाईलाजाने, महाराष्ट्र राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या व राज्य सहकारी संघ व जिल्हा सहकारी बोर्ड यांच्या संयमशील कायद्याच्या चौकटीतील विरोधामुळे महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त मा. श्री. रत्नाकर गायकवाड यांना ''सुधारित उपविधी'' जबरदस्तीने लादण्याचा आदेश १५ ऑगस्ट २००३ पर्यंत पुढे ढकलावा लागला व तो लेखी आदेश त्यांना १८ फेब्रुवारी २००३ रोजी प्रसिध्द करावा लागला. हा या सहकार चळवळीत उपरोक्त संस्थांमध्ये काम करणारे पदाधिकारी संचालक व कार्यकर्त्यांचा तात्पुरता विजय आहे. हे या निमित्ताने सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

मा. श्री. रत्नाकर गायकवाड हे आय. एस. अधिकारी अत्यंत जिज्ञासू व निष्कलंक आणि अधिकारी म्हणून आणि गेली २५ वर्षे या राज्यामध्ये विविध ठिकाणी काम करताना पाहिले आहेत व अनुभवले आहेत. परंतु नवीन आदर्श उपविधी व शासकिय लेखा परिक्षणाचे नवीन आदेश यांनी राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना हे दोन्ही निर्णय बेकायदेशीररित्या लादण्याचे आदेश का काढले ? व ह्या स्वप्नरंजित, अव्यवहारिक, अविचाराला ते बळी कसे पडले हा संपुर्ण राज्यात चर्चेचा व चिंतेचा विषय बनलेला आहे.

जे बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमध्ये अंतर्भूत नाही, ते महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० कलममध्ये किंबहुना समाविष्ट नाही व राज्याच्या विधीमंडळाने तयार केलेल्या कायद्याच्या विरोधामध्ये आहे, ते वरील पतसंस्थांनी स्विकारावे, ठराविक ठिकाणी ते उपविधी खरेदी करावेत, या उपविधीचे पब्लिकेशन चे अधिकार, विक्रीचे अधिकार ठराविक संस्था / व्यक्तिंना द्यावे हे गौडबंगाल महाराष्ट्र राज्याला सहकारामुळे प्रगतीपथावर नेणाऱ्या कार्यकर्त्यांना शेवटपर्यंत समजले नाही. व त्यासाठी गप्पही बसता येणार नाही.

दि. १८/०२/२००३ रोजी हे 'सुधारीत उपविधी' स्विकारण्यासाठी १५ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ देण्याचे जे परिपत्र मा. सहकार आयुक्त श्री. रत्नाकर गायकवाड यांनी प्रसिध्द केले ते सुध्दा चमत्कारीक, संभ्रमीत व पुन्हा एकदा संपुर्ण अर्थव्यवस्थेच्या अडचणीत भर टाकण्याचे काम केल्याचे निदर्शनास येईल. ज्या पतसंस्थांनी / कार्यकर्त्यांनी हे उपविधी खरेदी केले व त्यासाठी जे करोडो रूपये नागरी ग्रामीण सहकारी पतसंस्थाकडून **जिझीया कर** म्हणून वसुल केले ती रक्कम परत कोण देणार व याला जबाबदार कोण ? हा प्रश्न अनुत्तरीत ठेवता येणार नाही. शिवाय शासकिय लेखा परिक्षणाचे नवीन आदेश व एम.आय.एस. पध्दत यात बदल करण्याचे मान्य करूनही तो आदेश मात्र अजूनही मा. श्री. रत्नाकर गायकवाड ह्या अत्यंत चारित्रसंपन्न, विद्वान व निष्कलंक अधिकाऱ्याकडून

व्हावेत ही बाब सर्वांना जबरदस्त खटकणारी व त्या पाठीमागे फार प्रचंड कुटील डाव असण्याची भिती राज्यामध्ये सर्वांच्या मनात उभी राहीलेली आहे.

या आदर्श उपविधी बनविताना त्या कमिटीत कुणाची नियुक्ती व केव्हा केली? त्यासाठी किती सभा झाल्या? त्या सभेमध्ये कोणकोण हजर होते? त्या सभांचे इतिवृत्त काय? हे जुलमी नवीन आदर्श उपविधीतील बेकायदेशीर नियम अंतर्भूत करण्यास कोणी विरोध केले? राज्याचे मा. सहकार सचिव व राज्याचे मुख्यमंत्री / उपमुख्यमंत्री व सहकारमंत्री यांना या नवीन आदर्श उपविधीची आवश्यकता कायद्याच्या चौकटीतच आहे. किंवा नाही हे उघड झाले पाहिजे. मा. सहकार आयुक्त या मोहजाळात ज्यांच्यामुळे अडकले त्याच लोकांना पुण्याच्या सहकार आयुक्ताच्या कार्यालयात बोलावून व नवीन आदर्श उपविधी व लेखापरिक्षणाच्या आदेशा संदर्भात त्यात दुरूस्ती सुचविणारी पत्रे लिहून घेतली. याचा अर्थ ज्यांनी बिघडवायचे त्यांनीच पुन्हा दुरूस्त करण्याची साळसूद भाषा लोकांसमोर आणावयाची, हा विष वल्लीचा प्रकार ह्या महाराष्ट्र राज्यात केव्हाही यशस्वी होणार नाही. व कार्यकर्ते ते कदापिही यशस्वी होवू देणार नाहीत, हे ह्या निमित्ताने स्पष्टपणे निविदीत करित आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकार मंत्री, मा. सचिव, व मा. सहकार आयुक्त यांना पुन:श्च विनंती करण्यात येते की, नवीन आदर्श उपविधी व लेखापरिक्षणाचे आदेश हे केवळ पुढे न ढकलता ताबडतोब मागे घेण्याचे आदेश काढावेत. तद्नंतर बदलत्या आर्थिक परिस्थितीत तोंड देण्यासाठी खुल्या अर्थव्यवस्थेत व स्पर्धात्मक आर्थिक चळवळीत नागरी / ग्रामीण बिगर सहकारी पतसंस्थांना प्रथम टिकून रहावे, जनतेच्या ठेवी व भागाची रक्कम, टाकलेला विश्वास याचे शंभर टक्के जतन व्हावे व संरक्षण मिळावे यासाठी ह्या दोन्ही विषयांसाठी प्रथम समिती स्थापन करावी आणि त्या समितीमध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकांचे फेडरेशन, राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण पतसंस्थांचे फेडरेशन्स्, यांना शंभर टक्के समाविष्ट करावे आणि त्यांच्या ह्या समितीतील विचार मंथनातून नवीन आदर्श उपविधी व शालेय लेखापरिक्षणाचे नवे आदेश याचा कच्चा मसुदा प्रथम तयार करावा व तो राज्यभर सर्वांसाठी सुचना व दुरूस्तीसाठी खुला ठेवावा आणि तद्नंतर नवी आदर्श उपविधी आमलात आणावा आणि हेच राज्याच्या हिताचे व सहकार तत्त्वाचे मुळ तत्त्वाशी सुसंगत राहणार आहे.

अखेर महाराष्ट्र राज्य सहकार आयुक्त सन्माननिय श्री. रत्नाकर गायकवाड यांना आपल्या सदगुणांची पुन्हा एकदा प्रचिती महाराष्ट्र राज्य सहकार चळवळीत या माध्यमातून मिळावी ही अपेक्षा या निमित्ताने करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**